# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर-०१, महाराष्ट्र (भारत)

**MAHARASHTRA ANIMAL & FISHERY SCIENCES UNIVERSITY,**

**Futala Lake Road, Nagpur- 01, Maharashtra (India)**

Ph. no. 0712-2511784/85 Fax 0712-2511273, Email-registrar@mafsu.ac.in, web: www. mafsu.ac.in


**जा. क्र. मपमविवि/आस्था-१/२६४/२६,** **दिनांक : २८/०४/२०२६**

**वाचा :** विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. मपमविवि/आस्था-१/९२/१९, दि. ०८/०४/२०१९

**प्रस्तावना :** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालय/संस्था/प्रक्षेत्रे येथील सर्व सहयोगी अधिष्ठाता/ कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून इतर विद्यापीठे/संस्था/शासकीय/निम्न शासकीय कार्यालये येथील उच्च व तत्सम पदांकरिता विहीत मार्गाने (ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने) अर्ज सादर करण्याकरिताचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यात येतात व त्याअनुषंगाने विद्यापीठाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेबाबत विनंती करण्यात येते. तथापि, अश्या प्रकारचे प्रस्ताव सादर करतांना विद्यापीठ प्रशासनास असे निदर्शनास आले आहे की, बरेचशे प्रस्ताव संबंधीत जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर उशीराने विद्यापीठास मंजुरीस्तव सादर करण्यात येतात. तसेच सदर प्रस्ताव सादर करतांना संदर्भिय विद्यापीठ परिपत्रकानुसार आवश्यक मुद्दयांची माहिती सादर करण्यात येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी विद्यापीठातर्फे वेळेत कार्यवाही करणे शक्य होत नाही. त्यामुळे संदर्भिय परिपत्रक अधिक्रमित करुन नविन बाबींचा समावेश करण्याची व त्यानुसार नव्याने परिपत्रक निर्गमित करण्याची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

## :: परिपत्रक ::

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालये/संस्था/प्रक्षेत्रे येथील सर्व सहयोगी अधिष्ठाता/कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना इतर विद्यापीठे/संस्था/शासकीय/निम्न शासकीय कार्यालये येथील उच्च व तत्सम पदाकरिता विहीत मार्गाने (ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीने) अर्ज सादर करण्याकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" मिळण्याबाबतचे किंवा परवानगी मिळणेबाबतचे प्रस्ताव सादर करतांना जाहिरात प्रसिध्द झाल्यावर इच्छूक अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्वरीत (साधारणपणे प्रथम आठवड्यात) कार्यालय प्रमुखामार्फत विद्यापीठास ना हरकत प्रमाणपत्र/परवानगी प्राप्त करण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याची दक्षता घ्यावी. कार्यालय प्रमुखाने सदर प्रस्तावासोबत खालील नमुद मुद्दयांची माहिती देखील सादर करण्याची दक्षता घ्यावी. सदर प्रस्ताव उशीराने तसेच परीपूर्ण नसल्यास संबंधीतास "ना हरकत प्रमाणपत्र" निर्गमित करण्याकरिता किंवा परवानगी मिळण्याकरिता विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी. विद्यापीठास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यास "ना हरकत प्रमाणपत्र/परवानगी" निर्गमित करण्याचे अधिकार विद्यापीठ राखुन ठेवत आहे.

त्याअनुषंगाने अश्या प्रकारचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करतांना खालील नमुद बाबींचा समावेश करुन प्रस्ताव सादर करण्यात यावा.

१) ज्या पदाकरिता अन्य विद्यापीठाकडे/संस्थेमध्ये/शासकीय/निम्न शासकीय कार्यालयाकडे अर्ज करावयाचा आहे, त्या विद्यापीठाची/संस्थेची/शासकीय/निम्न शासकीय कार्यालयाची जाहिरात अर्जासोबत जोडली आहे काय ?

२) जाहिरातीमधील निकष, अटी व शर्तींची संबंधित अधिकारी/कर्मचारी पुर्तता करीत आहे किंवा कसे ?

३) विद्यापीठ नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार अर्ज सादर करण्यास पात्र आहे किंवा कसे ?

४) संबंधीतांवर शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे किंवा कसे ?

कृ.मा.प.

५) आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने मा. कार्यकारी परिषदेच्या दिनांक १० जानेवारी, २०२० च्या ८१ व्या सभेतील ठराव क्र. ९२/२०१९ मधील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित अधिकारी/कर्मचारी करीत आहे किंवा कसे ?

६) संबंधीत अधिकाऱ्याकडे संशोधन अथवा इतर प्रकल्पांची प्रकल्प संशोधक/सह प्रकल्प संशोधकाची जबाबदारी आहे किंवा कसे ?

७) संबंधीतावर गैरवर्तणूक, गैरप्रकार वा आर्थिक अपहारासंबंधी फौजदारी गुन्हा दाखल आहे किंवा कसे ?

८) संबंधीतावर विभागीय चौकशी सुरु आहे किंवा कसे ?

९) संबंधीतावर न्यायिक कार्यवाही प्रलंबित अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ?

१०) संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांची शिफारस केल्यास त्याचा महाविद्यालयाच्या शैक्षणिक/कार्यालयीन कामावर परिणाम होईल किंवा कसे ?

उपरोक्त नमुद बाबींच्या व्यतिरिक्त यासोबत दिलेल्या परिशिष्टातील प्रमाणपत्र वेगळ्याने सादर करण्यात यावे व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**सहपत्रः-** परिशिष्ट

**स्वाक्षरीत/-**
**कुलसचिव,**
**मपमविवि, नागपूर**

**<u>प्रत माहितीस्तव :</u>**

मा. कुलगुरु महोदय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे खाजगी सचिव.

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :</u>**

१) मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशुविज्ञान विद्या शाखा), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
२) मा. संचालक संशोधन, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
३) मा. संचालक विस्तार शिक्षण, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
४) मा. अधिष्ठाता (निम्न शिक्षण), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
५) मा. अधिष्ठाता (दुग्ध तंत्रज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
६) मा. अधिष्ठाता (मत्स्य विज्ञान), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
७) विद्यापीठ ग्रंथपाल, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
८) संचालक तथा प्रकल्प संशोधक, वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्र, गोरेवाडा
९) विद्यापीठ अभियंता, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
१०) नियंत्रक (वित्त व लेखा), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
११) सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय- मुंबई/नागपूर/परभणी/शिरवळ/उदगीर/अकोला
१२) सहयोगी अधिष्ठाता, दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय- वरुड/उदगीर
१३) सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय- नागपूर/उदगीर/मोर्शी
१४) संचालक विद्यार्थी कल्याण तथा जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
१५) उपसंचालक संशोधन, पशुपैदास प्रक्षेत्रे- ईगतपुरी/बोरगांव मंजू/नागपूर/उद्‌गीर
१६) परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
१७) उपकुलसचिव (विद्या), महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
१८) सहाय्यक संचालक, विद्यापीठ उपकेंद्र, उद्‌गीर

**(मोना. कृ. ठाकुर)**
**कुलसचिव,**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**नागपूर**

# परिशिष्ट

## संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याने सादर करावयाचे हमीपत्र

प्रमाणित करण्यात येते की, मी____________________ विद्यापीठाच्या पूर्व परवानगी/ना हरकत प्रमाणपत्राशिवाय अन्य विद्यापीठाकडे/संस्थेमध्ये/शासकीय/निम्न शासकीय कार्यालयाकडे ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने परस्पर अर्ज सादर केलेला नाही. अर्ज सादर केला असल्यास शासन निर्णय/विद्यापीठ अधिनियम/परिनियमातील विविध तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाहीस पात्र राहील, तसेच सेवाविषयक लाभापासून वंचित राहील्यास त्याकरिता मी स्वत: जबाबदार राहील.

दिनांक :

**अर्जदाराचे नाव, पदनाम व स्वाक्षरी**

## संबंधीत कार्यालय प्रमुखाने सादर करावयाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/डॉ.__________________________ हे __________________या पदावर ________________ या वेतनश्रेणीत कार्यरत असुन अन्य विद्यापीठाकडे/संस्थेमध्ये/शासकीय/निम्न शासकीय कार्यालयाकडे ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने अर्ज करण्यास इच्छूक आहेत व त्यांनी “ना हरकत प्रमाणपत्रा” करिता विनंती केलेली आहे. तथापि, त्यांनी सदरील परिपत्रकातील सुचनेनुसार अद्यापपर्यंत परस्पर अर्ज सादर केलेला नसल्याचे नमुद केले आहे. करिता श्री/श्रीमती/डॉ.___________________ यांना “ना हरकत प्रमाणपत्र” देण्यास हरकत नसावी.

**टिप :** हरकत असल्यास त्याबाबतची कारणमिमांसा नमुद करावी.

दिनांक :

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**